# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – १५ ऑगस्ट २०१५

## समाजात विद्यापीठांची भूमिका महत्वाची –कुलगुरु डॉ.संजय देशमुख

मुंबई – शिक्षण हे समाज घडविण्याचे सशक्त माध्यम असून त्यात विद्यापीठांचा महत्वाचा वाटा असतो. विद्यापीठाची वाटचाल योग्य रितीने व्हावी, विद्यापीठाचा नावलौकीक वाढावा, संशोधनाला गती मिळावी यासाठी विद्यापीठ सदैव तत्पर राहणार असून यामध्ये सर्वांनीच योगदान द्यावा असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांनी केले.मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात आयोजित करण्यात आलेल्या स्वातंत्र्यदिन समारंभात त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला.कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांच्या हस्ते सर फिरोजशहा मेहता भवनाच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले.ध्वजारोहणानंतर उपस्थितांशी संवाद साधतांना कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांनी विद्यापीठ शिक्षण आणि मुंबई विद्यापीठाबद्दल सादरीकरण केले.जागतिक दर्जाचे शिक्षण देण्यावर विद्यापीठाचा भर असून त्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.शिक्षण,संशोधन,आणि प्रशासनवर अधिक भर देत मुंबई विद्यापीठाला उंची गाठायची असून त्यासाठी सर्वांचे योगदान कामी येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

स्वातंत्र्यदिन समारंभाचे औचित्य साधून, राष्ट्रीय सेवा योजना,विद्यार्थी कल्याण विभाग, क्रिडा विभाग,युवा महोत्सव,अविष्कारमध्ये बाजी मारलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार कुलगुरु महोदयांच्या हस्ते करण्यात आले.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)